# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.२१८/२०२०

**विषय : पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या संशोधनाबाबतची माहिती अद्ययावत करणे, तसेच प्रोग्रेस रिपोर्ट, पुनर्नावनोंदणी अर्ज, गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) इ. ऑनलाईन पध्दतीने Ph. D. Tracking System वर सादर करणेबाबत.**

विद्यापीठाने, विद्यापीठ विभाग व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१७ पासून **Ph.D.Tracking System** सुरू केलेली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनाबाबतची माहिती सदर **System** वर अद्ययावत करणेबाबत परिपत्रक संदर्भ क्र. शै.प्रवेश २०५/२०१६ दि. ०५/१२/२०१६, परिपत्रक संदर्भ क्र. शै.प्रवेश ५०९५ दि. ३०/१२/२०१६, परिपत्रक संदर्भ क्र. शै.प्रवेश ८७१ दि. ०३/०३/२०१७ अन्वये सर्व संबंधितांना सूचित करण्यामत आलेले आहे. सोबत सदर परिपत्रकांच्या प्रती अवलोकनार्थ जोडल्या आहेत.

वरील परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनेनुसार पीएच.डी. संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी सदर **System** वर आपल्या प्रवेश व संशोधनाबाबतच्या प्रोग्रेस रिपोर्ट पर्यंतची माहिती अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि अद्यापही काही विद्यार्थ्यांनी आपली माहिती अद्ययावत केलेली नाही.

कोरोना विषाणुच्या (COVID – 19) प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेली परिस्थिती व लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांना विद्यापीठ कार्यालयात प्रत्यक्ष येऊन संशोधनाबाबतची माहिती, पुनर्नावनोंदणी अर्ज, तसेच प्रबंध सादर करणे इ. प्रक्रिया पार पाडता आलेली नाही.

सदर परिस्थिती विचारात घेता विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या स्वाथ्यास प्रथम प्राधान्य देऊन पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार सादर करावयाची कागदपत्रे, अर्ज, गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis), इ. बाबतची कार्यवाही ऑनलाईन/दुरस्थ माध्यमातून करावी असे निश्चित केलेले आहे. त्यानुसार यासाठी विद्यार्थ्यांना या सर्व सुविधा ऑनलाईन पध्दतीने **Ph.D. Tracking System** वर उपलब्ध करून देण्यात येत आहे. विद्यार्थीनी त्यांची माहिती **Ph.D. Tracking System** वर कशी अद्ययावत करावी याबाबत वरील परिपत्रकान्वये यापूर्वीच सूचना देण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबतची माहिती अद्ययावत करणे, तसेच प्रोग्रेस रिपोर्ट, पुनर्नावनोंदणी अर्ज, गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis)इ. सॉफ्ट प्रतीमध्ये **(Soft Copy) Ph.D. Tracking System** वर दि. ०१ ऑगस्ट २०२० पासून सादर कराव्यात.

प्रचलित कार्यपध्दतीनुसार विद्यार्थी एम.फिल/पीएच.डी. प्रबंध/प्रबंधिका व इतर मान्यतेची कागदपत्रे विहित नियमानुसार प्रत्यक्ष स्वरूपात शैक्षणिक प्रवेश विभागामध्ये सादर करतात. ऑनलाईन सोबतच ही व्यवस्थाही सुरू राहणार असून विद्यार्थ्यांना या दोन्हीपैकी (प्रत्यक्ष किंवा ऑनलाईन) यापैकी कोणत्याही एक पध्दतीचा वापर करता येईल.

### <u>ऑनलाईन प्रक्रियेबाबतची कार्यपध्दती</u>

**विद्यार्थ्यांनी करावयाची ऑनलाईन प्रक्रिया :–**

- विद्यापीठ संकेतस्थळावर जाऊन Research या Tab वर Ph.D. Tracking या link वर Click केल्यानंतर Sign-up करावे.
- या लिंकव्दारे प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला योग्य ई–मेल आयडी व मोबाईल नंबर वापरून अकाऊंट तयार करावे.
- अकाऊंट तयार झाल्यानंतर login link ला Click करून आपली माहिती अद्ययावत करावी.

- सदर अकाऊंट विद्यार्थ्याने त्याच्या पुढील सर्व प्रक्रियेसाठी वापरावयाचे आहे. त्यामुळे आपला User Name व Password जतन करून ठेवावा.
- प्रत्येक विद्यार्थ्यास अकाऊंट तयार करताना PUNCODE टाकणे आवश्यक आहे. PUNCODE म्हणजे विद्यापीठ विभाग/संशोधन केंद्र/संस्था यांचा BCUD Online चा User Name.
- पीएच. डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी तसेच ज्या विद्यार्थ्यांचे Provisional Admission झालेले असेल किंवा गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) सादर केलेले असेल अशा सर्व विद्यार्थ्यांनी सुध्दा आपली Online माहिती अद्ययावत करणे अनिवार्य आहे.

**संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभागासाठी ऑनलाईन प्रक्रिया :—**

- संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभाग यांनी आपल्या BCUD Online Login व्दारे Login करावे.
- विद्यापीठ विभाग/संशोधन केंद्र/संस्था येथील संशोधन मार्गदर्शक (Research Guide) यानी त्यांच्या PG Recognition/Research Guide Recognition बाबतची माहिती BCUD Online Login व्दारे Teacher/College Profile मध्ये अद्ययावत करणे आवश्यक आहे.
- Login झाल्यानंतर Ph. D. Tracking System यावर डाव्या बाजुला दिलेल्या मेनू मधून link Open करावी.
- आपल्या संशोधन केंद्र/संस्था/विद्यापीठ विभाग अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन माहिती भरलेली आहे अशा विद्यार्थ्यांची माहिती Confirm Button करून स्वीकारावी.
- **विद्यार्थ्यांचे नाव Confirm केल्यानंतर आपणांस विद्यार्थ्यांची माहिती बघता येईल व त्यात काही दुरूस्ती करावयाची असेल तर दुरूस्ती करता येईल.**
- संशोधन केंद्रातील ज्या मार्गदर्शकांची माहिती **BCUD Online** मध्ये अद्ययावत केलेली नसेल अशा मार्गदर्शकांची माहिती प्रथम त्या त्या संशोधन केंद्रानी अद्ययावत करणे आवश्यक आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना आपली माहिती भरण्यास अडचणी येणार नाहीत.

**प्रोग्रेस रिपोर्ट, पुनर्नावनोंदणी अर्ज, गोषवारा (Synopsis)/प्रबंध (Thesis) सादर करणेबाबत ऑनलाईन प्रक्रिया.**

- ऑनलाईन प्रक्रियेबाबत User Manual मध्ये दिलेल्या सुचनेनुसार प्रोसेस करावी. User Manual हे Ph.D. Tracking System या लिंकवर उपलब्ध आहे.
- प्रोग्रेस रिपोर्ट, पुनर्नावनोंदणी अर्ज, गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) सॉफ्ट कॉपीमध्ये सादर करावयाचे असल्याने त्याची कमाल मर्यादा ५ एम.बी. साईज मध्ये असणे आवश्यक आहे. त्यानुसार Ph.D. Tracking System वर जाऊन Uploade करावेत.
- पुनर्नावनोंदणी/गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) सादर करताना विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्जासह सोबत जोडलेल्या यादीतील कागदपत्रे आपल्या Ph.D. Tracking System - login वर अद्ययावत करणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रांची पुर्तता नसल्यास याबाबत कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.
- सॉफ्ट कॉपी मध्ये माहिती सादर करताना विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांना पुनर्नावनोंदणी/ गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) साठी विहित केलेले शुल्क ऑनलाईन पध्दतीने Debit / Credit Card / Net Banking इ. व्दारे भरता येईल.
- विद्यार्थ्यांनी सादर केलेले अर्ज/ गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) यास संबंधित विद्यापीठ विभाग व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व मार्गदर्शक यांनी approved केल्यानंतरच त्यावर शैक्षणिक प्रवेश विभागामार्फत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या एम.फिल./पीएच.डी. मौखिक (Viva-Voce) परीक्षाबाबत.**

सद्यस्थितीत ज्या विद्यार्थ्यांचे एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमांसाठी विहित केलेल्या तरतुदीनुसार संशोधन पूर्ण झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा (Viva-voce) व्हिडीओ कॉन्फरंसिंगव्दारे घेण्यात येत आहेत. यासंदर्भात विद्यापीठ परिपत्रक क्र. ११३/२०२० दि. ०८/०६/२०२० व परिपत्रक क्र. ११५/२०२० दि. १२/०६/२०२० नुसार सूचना देण्यात आलेले आहेत.

**पीएच.डी. मौखिक परीक्षा (Viva-voce) घेण्यासंदर्भात कार्यवाही करताना पुढील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. :**

१. संबंधित मार्गदर्शकांकडे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची संशोधनाबाबतची संपूर्ण माहिती **Ph.D. Tracking System** वर अद्ययावत असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी माहिती अद्ययावत केली असल्याबाबत संबंधित संशोधन केंद्रानी व मार्गदर्शकाने खात्री करून घ्यावी.

२. संशोधक विद्यार्थ्यांने सादर केलेल्या प्रबंध/प्रबंधिका संदर्भातील परिक्षकांचे अहवाल विहित तरतुदीनुसार विद्यापीठास प्राप्त होणे आवश्यक असून अहवालासंदर्भात मार्गदर्शकाने शैक्षणिक प्रवेश विभाग यांच्याकडून अद्ययावत माहिती प्राप्त करून घ्यावी. तद्नंतर **मौखिक परीक्षा (Viva-voce) आयोजित करण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.**

३. **संशोधक विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा (Viva-voce) विद्यापीठातील ECDLIC (Econtent Development and Learning Innovation Center) मार्फत घ्यावयाची असल्याने या बाबत विद्यापीठ विभागप्रमुख यांनी संचालक ECDLIC (Econtent Development and Learning Innovation Center) यांच्या सोबत चर्चा करून Viva-voce नियोजन करणे आवश्यक आहे.**

४. मार्गदर्शकाने मौखिक परीक्षेसाठी (Viva-voce) Request generate करण्याची प्रक्रिया किमान १५ दिवस आधी पूर्ण करणे आवश्यक आहे.

५. मार्गदर्शकाने विद्यापीठ विभागप्रमुख, बाहय परिक्षक यांच्या सोबत चर्चा करून अनुमती प्राप्त झाल्यानंतर संशोधक विद्यार्थ्यांच्या मौखिक परीक्षेचे (Viva-voce) नियोजन करावे

६. संबंधित मार्गदर्शकांनी आपल्या **Teachers Login** मध्ये जाऊन Viva-voce चे नियोजन करण्यासाठी ऑनलाईन अर्ज Generate करावा.

७. ऑनलाईन अर्ज (Request generate) प्राप्त झाल्यानंतर बाहय परीक्षक (External Refree) व Chairman (HOD, concern University Department of SPPU. ) यांना System व्दारे ई—मेल पाठविला जाईल. त्या ई—मेल वर दिलेल्या लिंकवरून त्यांनी त्यांची Viva-voce साठीची उपलब्धता कळवावी.

८. मार्गदर्शकाने Request generate केल्यानंतर विद्यार्थ्यांनी मौखिक परीक्षेसाठी (Viva-voce) निश्चित केलेले शुल्क Ph.D. Tracking System वर जाऊन ऑनलाईन पध्दतीने Debit / Credit Card / Net Banking इ. व्दारे भरावे.

९. मार्गदर्शक व विद्यापीठातील संबंधित विभाग यांच्याकडून Viva-voce बाबत ऑनलाईन अर्ज (Request generate) प्राप्त झाल्यानंतर तसेच **ECDLIC** यांनी सेंटर उपलब्धतेबाबत confirm केल्यानंतर phdviva@pun.unipune.ac.in या ई—मेलवर शैक्षणिक प्रवेश विभागाकडून Viva-voce घेण्यासंदर्भात नोटीस पाठविण्यात येईल. तद्नंतरच संबंधित मार्गदर्शकाने IT Cell/ECDLIC centre, SPPU यांच्या मदतीने विद्यार्थ्याची Viva-voce घेण्यासंबंधिची कार्यवाही पूर्ण करावी.

१०. मौखिक परीक्षेची (Viva-voce) कार्यवाही झाल्यानंतर विहित प्रपत्रात माहिती भरून phdviva@pun.unipune.ac.in या ई—मेलवर सादर करावी.

**<u>एम.फिल मौखिक परीक्षा (Viva-voce) घेण्यासंदर्भात</u>**

- एम.फिल अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या संशोधनाबाबतची सर्व प्रक्रिया संबंधित विद्यापीठ विभाग व संशोधन केंद्र येथेच होत असल्याने प्रबंधिका सादर करणे इ. बाबची कार्यवाही संबंधित विद्यापीठ विभाग व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथेच करण्यात यावी.

<u>विद्यापीठ विभागा करीता : —</u>

- विद्यापीठ विभागातील एम.फिल. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती Ph.D. Tracking System वर अद्ययावत करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे वर विहित केल्यानुसार Viva-voce घेण्यासाठी कार्यपध्दती अवलंबिता येणार नाही. तथापि विद्यापीठ विभागात एम.फिल साठी संशोधन करीत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे संशोधनाचे काम पूर्ण झालेले आहे. अशा विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेण्यासाठी phdviva@pun.unipune.ac.in या ई—मेलवर विद्यार्थ्यांच्या माहितीसह Request पाठविल्यास त्यांना Viva घेण्यासाठी त्यांना लिंक उपलब्ध करून देता येईल.

**मान्यताप्राप्त संशोधन केंद्रांकरीता :—**

- एम.फिल अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याच्या संशोधनाबाबत Viva-voce पर्यंतची सर्व प्रक्रिया संबंधित संशोधन केंद्र येथेच होत असल्याने या बाबतची कार्यवाही मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथेच करण्यात यावी.

**प्री—पीएच.डी. सिनॉपसिस प्रेझेंटेशन (Pre -Ph.D. Synopsis presentation)**

पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या तरतुदीनुसार संशोधक विद्यार्थ्यांनी प्रबंध/प्रबंधिका सादर करण्यापूर्वी संशोधनकरीत असलेल्या विद्यापीठ विभाग /मान्यता प्राप्त संशोधन केंद्र येथे Research Advisory Committee पुढे संशोधनाबाबतचे सादरीकरण करून (Pre Ph.D. Synopsis presentation) आवश्यक बाबींची पूर्तता करून अहवाल सादर करण्यात येतो. तथापि कारोनोमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संशोधन केंद्र येथे उपस्थित राहून सादरीकरण करणे सोयीचे होत नाही.

संशोधक विद्यार्थ्यांची प्री—पीएच.डी. सिनॉपसिस प्रेझेंटेशन (Pre Ph.D. Synopsis Presentation) घेण्याबाबतची कार्यवाही संबंधित विद्यापीठ विभाग व संशोधन केंद्र येथे होत असल्याने व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे प्रेझेंटेशन घेण्याबाबतची कार्यवाही संबंधित संशोधन केंद्रामार्फत पार पाडावी.

**महत्वाची सुचना :—**

- विद्यापीठ विभाग/मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे संशोधन करीत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती आपल्याकडे अद्ययावत ठेवण्यात यावी.
- जे विद्यार्थी त्यांच्या संशोधनाचे काम अर्धवट सोडून गेले असतील अथवा थांबविले असेल किंवा मुदत संपूनही विहित केलेल्या तरतुदीनुसार पुनर्नावनोंदणी केलेली नसेल/मुदतवाढ घेतली नसेल अशा विद्यार्थ्यांची माहिती त्या त्या वेळी या कार्यालयास सादर करावी. जेणेकरून सदर विद्यार्थ्यांची नावे वगळण्याबाबत कार्यवाही करता येईल.

तरी पीएच.डी. अभ्यासक्रमास संशोधन करीत असलेल्या विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक, विद्यापीठ विभाग, मान्यताप्राप्त संशोधन केंद्र यांनी प्रोग्रेस रिपोर्ट, पुनर्नावनोंदणी अर्ज, गोषवारा (Synopsis), प्रबंध (Thesis) इ. सादर करणे व अंतिम Viva-voce घेण्यासंदर्भात वर दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करावी.

ऑनलाईन संदर्भात तांत्रिक मदतीसाठी संपर्क :—

- दुरध्वनी क्रमांक : ०२०—२५६२१२०५
- ई—मेल आयडी :— phdtracking_support@pun.unipune.ac.in (For Ph.D. Tracking)
  phdviva@pun.unipune.ac.in (For M.Phil./Ph.D. Viva-voce)

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे — ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/११७८
दिनांक : २८/०७/२०२०

प्रत :—

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था/संशोधन केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

आपणांस विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागात/संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांच्या व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येऊन उपरोक्त दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात यावी.